# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **ता. ८ ऑगस्ट २०१९**

# तेलंखेडी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे लोकार्पण आज

**नागपूर, ता. ८ :** राष्ट्रीय आरोग्य अभियान नागपूर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग क्र. १३ मधील तेलंखेडी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे उद्या शुक्रवारी (ता.९) सार्वजनिक बांधकाम, वने, आदिवासी विकास राज्यमंत्री डॉ. परिणय फुके यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. तेलंखेडी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र सुदामनगर अंबाझरी येथे दुपारी ४ वाजता आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर नंदा जिचकार राहतील.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून खासदार विकास महात्मे, आमदार सर्वश्री नागो गाणार, प्रकाश गजभिये, प्रा. जोगेंद्र कवाडे, प्रा. अनिल सोले, गिरीश व्यास, सुधाकर देशमुख, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, डॉ. मिलींद माने, सुधाकर कोहळे, उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, सत्तापक्ष नेते संदीप जोशी, विरोधी पक्षनेते तानाजी वनवे, आयुक्त अभिजीत बांगर, बसपा पक्षनेता वैशाली नारनवरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षनेता दुनेश्वर पेठे, शिवसेना पक्षनेता किशोर कुमेरिया, वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती सभापती वीरेंद्र कुकरेजा, धरमपेठ झोन सभापती अमर बागडे, नगरसेविका रूतिका मसराम, नगरसेविका डॉ. परिणीता फुके,

नगरसेविका वर्षा ठाकरे, अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, अतिरिक्त आयुक्त अझीझ शेख, आरोग्य नागपूर मंडळ उपसंचालक डॉ. संजय जयस्वाल, टाटा ट्रस्टचे मुख्य वित्त व लेखा अधिकारी आशिष देशपांडे, टाटा ट्रस्टचे आरोग्य निर्देशक एच.एस.डी. श्रीनिवास, टाटा ट्रस्टचे विभागीय व्यवस्थापक मुकुल गुप्ते, टाटा ट्रस्टचे यू.पी.एच.सी. प्रोजेक्ट लीड मॉडेल डॉ. अमर नवकर आदी उपस्थित राहतील.

कार्यक्रमाला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मनपा आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.